# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विदयामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- https://kbmc.gov.in


जावक क्रमांक/कु-ब.न.प./नरवि/ ३११२ /२०२२-२०२३ दिनांकः ९८/०५/२०२२

## बांधकाम पूर्णतेचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र

**प्रति,**
**श्री.वामन गोविंद गोळे व श्रीमती निर्मला रविंद्र कराळे यांचे कु.मु.प.धारक**
**मे.आशिष गोळे प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स तर्फे प्रवतर्क श्री. आशिष वामन गोळे**
**द्वारा श्री.सतीश कानडे, वास्तुशिल्पकार, बदलापूर**

श्री.सतिश कानडे (वास्तुशिल्पकार) बदलापूर, बांधकाम परवाना क्र.सीओ/८२/६९९८ यांचे दि.०२/०३/२०२२ व दि.१३/०५/२०२२ रोजीचे अर्जावरुन दाखला देण्यात येतो की, त्यांनी कुळगांव-बदलापूर नगरपरिषद हद्दीत स.नं.१५०, प्लॉट नं.२ व स.नं.१५३, मौजे शिरगांव, ता.अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांचे कडील बांधकाम परवानगी क्र.कुबनप/नरवि/बांप/०२९३-२०१, दि.०८/०१/२०१८ व सुधारीत बांधकाम परवानगी क्र.कुबनप/नरवि/बांप/१६८४-७५, दि.२५/०२/२०२१ अन्वये मंजूर केलेल्या नकाशे प्रमाणे राहणेसाठी बांधकाम पूर्ण केले आहे. तरी खालील अटींवर भाग बांधकाम पूर्णतेचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे. (बांधकाम पूर्ण झाल्याची तारीख २८/०२/२०२२)

| मजले | विंग-बी (तळमजल्याकरीता) | | | | वापर |
|---|---|---|---|---|---|
| १) तळमजला | ४ | सदनिका | १२ | खोल्या | रहिवास |
| २) पहिला मजला | अस्तित्वातील<br>या कार्यालयाने पत्र क्र.कुबनप/नरवि/३४७४/२०२२-२०२३, दि.२५/०४/२०२२ अन्वये बांधकाम पूर्णतेचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे. | | | | |
| ३) दुसरा मजला | | | | | |
| ४) तिसरा मजला | | | | | |
| ५) चौथा मजला | | | | | |
| ६) पाचवा मजला | | | | | |
| एकूण - | ४ | सदनिका | १२ | खोल्या | |

**सबब, वरील जागेतील इमारत श्री.सतीश कानडे, वास्तुशिल्पकार, बदलापूर यांच्या देखरेखीखाली पूर्ण झालेला आहे, झालेले बांधकामात किरकोळ स्वरुपाचे बदल आहेत, सदरचे बदल हे प्रचलित नियमानुसार असल्याने तसे बदल नकाशात दर्शवून खालील अटींचे अधीन राहून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

१ जेव्हा सज्जा (बाल्कनी) बंदिस्त करण्यात आला/आली असेल तर त्याचे समोरील व वरील १/३ क्षेत्रासाठी, लुवर्स ग्लास, शटर्स अथवा ग्रील्स लावणे, अनिवार्य राहील व पॅरोपेट सोडून उर्वरित समोरील क्षेत्रासाठी ग्लेजड शटर्स बंदिस्त करणे आवश्यक राहील.

२ तळमजल्यास व टेरेस फ्लोअरला इलेवेशनल प्रोजेक्शन/ कॉर्नीस/ फ्लॉवरबेड असतील तर ते बंदिस्त करणे अनुज्ञेय असणार नाही. तसेच आजूबाजूच्या सामासिक अंतरात कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

३ भोगवटा प्रमाणपत्र सोबत दर्शविलेले नकाशातील बांधकामा व्यतिरिक्त इतर बांधकाम हे अनधिकृत समजण्यात येवून त्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४ भविष्यात सामासिक अंतरातील जागा नगरपरिषदेस रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक भासल्यास हस्तांतरीत करावी लागेल. टेरेस व पॉकेट टेरेस बंदिस्त करु नये.

५ पावसाळी पाणी वाया जावू नये यासाठी रुफ टॉप हार्वेस्टिंग करणेत यावे व पाणी जमीनीमध्ये मुरवावे.

६ सुका व ओला कचरा अलगीकरणासाठी व साठा करण्यासाठी स्वतंत्रपणे जागा निर्धारित करुन कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी संयंत्र उभारण्याची जबाबदारी विकासकाची आहे.

**सहाय्यक नगर रचनाकार**
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद

**मुख्याधिकारी तथा नियोजन प्राधिकारी**
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद